जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७० दिनांक -२८/०१/२०२५**

लोणीकाळभोर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## जुगारचालकावर कारवाई करुन जुगार अड्डयाचा केला बिमोड

लोणी काळभोर पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात वरिष्ठांचे आदेश व मार्गदर्शनाखाली अवैध धंद्यावर करवाई करण्याची मोहिम सुरू केली होती या मोहिमे दरम्यान दि.२७/०१/२०२५ रोजी बेट वस्ती,थेऊर फाटा,ता.हवेली,जि.पुणे येथे रेकॉर्डवरील सराईत जुगार चालक नामे माऊली ऊर्फ ज्ञानेश्वर निवृत्ती राखपसरे हा बेकायदेशीररित्या मटका / जुगार घेत असल्याची बातमी प्राप्त झाली.

सदर बातमी प्राप्त होताच त्याठिकाणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक,लोणीकाळभोर पोलीस स्टेशनचे श्री.राजेंद्र पन्हाळे यांनी स्वतः व पोलीस स्टाफ यांचेसह सापळा रचुन छापा कारवाई केली. सदर छापा कारवाई दरम्यान सदर आरोपी नामे १) माऊली निवृत्ती राखपसरे वय ४० वर्षे रा.लोणी काळभोर २) किशन शाहु टिंगरे वय ३९ वर्षे रा.सदर ३) बालाजी धर्मराज माने वय ३३ वर्षे रा.सदर याचे कडुन एकुण ४५५०/-रुपये रोख रक्कम व जुगाराचे साहित्य जप्त करणेत आले आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री. मनोज पाटील, मा. पोलीस उप-आयुक्त परि.५ पुणे श्री.डॉ.राजकुमार शिंदे, मा.सहा.पोलीस आयुक्त, हडपसर विभाग,पुणे श्रीमती अनुराधा उदमले यांचे मार्गदर्शखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे श्री. राजेंद्र पन्हाळे ,पोलीस उप-निरीक्षक अनिल जाधव पोलीस अंमलदार विर, पाटील, कुदळे, कर्डीले यांनी केली आहे.